महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)

CIN : U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. ०२२-२६४७१४३०/२६४७४२११
फॅक्स : ०२२-२६५८०६४२
E-mail: edhr_dist@mahadiscom.in
Website: www.mahadiscom.in

प्रकाशगड, ६ वा मजला,
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.

संदर्भ : कासं/मासं/रो.का./उपदान/ 3620

दिनांक: 16.2.2016

प्रति,
क्षेत्रिय कार्यालयातील सर्व
मुख्य अभियंता,

**विषय :- रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांची सेवा उपदानासाठी ग्राहय धरणेबाबत.**

सर्वसाधारण आदेश क्र.७३ (क) दि.२१.११.१९७३ नुसार तदर्थ मंडळातील सर्व कर्मचाऱ्यांना दि.१६.०९.१९७२ पासून उपदान कायदा १९७२ लागू केला आहे. तद् अनुषंगाने प्रशिक्षणार्थी आणि शिकाऊ कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त मंडळाचे सर्व स्थायी, अस्थायी कार्यव्ययी आस्थापना व नाममात्र हजेरीपटावरील कर्मचारी सेवा उपदान मिळण्यास पात्र आहेत. सदरचे नियम तदर्थ मंडळातील कर्मचारी जे सध्या कंपनी मध्ये कार्यरत आहेत त्यांना लागू आहेत.

परंतु असे निर्दशनास आले आहे की, काही क्षेत्रीय कार्यालयाकडून नाममात्र हजेरी पटावरील व कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची सेवा, तत्संबंधीच्या सेवापुस्तिकेतील पुरेशा नोंदी अभावी उपदानास पात्र धरण्यात येत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना नाममात्र हजेरीपट आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवा उपदानापासून वंचित ठेवण्यात येते अशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

तेव्हा आपल्या अधिपत्याखाली सर्व विभागीय क्षेत्रिय कार्यालयातील कार्यक्षेत्रांतर्गत कार्यरत असणाऱ्या नाममात्र हजेरीपटावरील व कार्यव्ययी आस्थापनेवरील परंतु आता कायमस्वरुपी नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेत तत्संबंधीच्या नोंदीच्या आधारे सेवा उपदान अदा करण्यात यावे. त्याचप्रमाणे जर अशा कर्मचा-यांच्या सेवापुस्तिकेमध्ये नाममात्र हजेरीपटावरील व कार्यव्ययी आस्थापनेवरील कार्यकालाच्या नोंदी आढळून न आल्यास कर्मचाऱ्याकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाची तसेच सदरच्या कालावधीमध्ये कर्मचाऱ्याच्या भ.नि.नि. खात्यावर मंडळाचा जमा झालेला वाटा याचा विचार करुन कार्यकालाची खात्री करुन घेण्यात येऊन सदरचा कालावधी सेवा उपदानाकरिता ग्राहय धरावी. कर्मचाऱ्याच्या खात्यावर जमा झालेल्या मंडळाच्या वाट्याची भ.नि.नि. विभागामध्ये उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाशी पडताळणी केल्यानंतरच सदरची सेवा कालावधी निश्चित करण्यात यावा व त्याच्या नोंदी सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात याव्यात, जेणेकरुन सेवासमाप्तीनंतर संबंधीत कर्मचा-यांना सेवा उपदान मिळण्यास अडचणी येणार नाहीत.

(सचिन ढोले)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रत सस्नेह रवानाः**
प्रादेशिक संचालक,
कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद.

D:Ambre Sir/Marathi letter.doc